सोमवार दि.१३ जानेवारी २०२५

हे शब्द आज माझे झाले मुके तरीही !
ते बोलतील भाषा हमखास वादळाची !!
–ॲड.डॉ विजयकुमार कस्तुरे चिखलीकर

जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ

# दैनिक बीड लोकनेता

मुख्यसंपादक : ज्ञानेश्वर बुधवत संपादक : ज्ञानेश्वर मुंढे



सुवर्णसंधी...! दैनिक लोकनेता सुवर्णसंधी...!
पत्रकार होण्यासाठी सुवर्ण संधी
दैनिक लोकनेता (जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ)
अल्पावधीतच वाचकांच्या लेखकांच्या पसंतीत उतरलेल्या दैनिक लोकनेता साठी संपूर्ण महाराष्ट्रात जिल्हा, तालुका शहर व गाव पातळीवर प्रतिनिधी नेमणे आहे.अनुभवी व विनाअनुभवी इच्छुकांनी त्वरित संपर्क साधावा !
संपर्क :- संपादक ८४५९९७७९०४




RNI-MAHMAR/2023/89402 Email : elokneta@gmail.com वर्ष : ०२ अंक :१२४ किंमत २ रुपये Lokneta News - लोकनेता न्युज 8459977904 epaper.lokneta.in


## जय जिजाऊ जयघोषाने दुमदुमले मातृतीर्थ!

# राजमाता जिजाऊ यांचा ४२७ वा जन्मोत्सव सोहळा उत्साहात साजरा

## केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव, मंत्री आकाश फुंडकर यांच्या हस्ते महापुजा









■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**बुलढाणा । ज्ञानेश्वर बुधवत**

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या मातोश्री राजमाता जिजाऊ यांचा आज जन्मदिवस असून त्यांच्या ४२७ व्या जयंतीनिमित्त सिंदखेड राजा येथील जन्मस्थळी 'राजमाता जिजाऊ जन्मोत्सव सोहळा' मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी केंद्रीय आयुष, आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांच्या हस्ते सुर्योदयावेळी शासकीय महापुजा करण्यात आली.

पुरातत्व विभाग, नागपूर, सिंदखेड राजा नगरपरिषद आणि मराठा सेवा संघाच्या वतीने आयोजित राजमाता जिजाऊ यांच्या जन्मोत्सव सोहळ्यानिमित्त कामगार मंत्री ड.आकाश फुंडकर, खासदार सुप्रिया सुळे, आमदार सिद्धार्थ खरात, आमदार मनोज कायंदे, लखुजीराजे जाधव यांचे वंशज शिवाजी जाधव, माजी आमदार डॉ. राजेंद्र शिंगणे, शशिकांत खेडेकर जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील, अपर जिल्हाधिकारी सदाशीव शेलार, उपविभागीय अधिकारी संजय खडसे, तहसिलदार, मुख्याधिकारी यांनी राजमाता जिजाऊ यांच्या जन्मस्थळाचे दर्शन घेवून अभिवादन केले.

महापुजा पार पडल्यानंतर केंद्रीय आयुष, आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव म्हणाले की, सिंदखेड राजा नगरीमध्ये राजमाता जिजाऊ यांचा ४२७ वा जन्मोत्सव सोहळा मोठ्या उत्साहात साजरा होत आहे. या जन्मोत्सवासाठी दरवर्षीप्रमाणे देशभरातून लाखो लोक राजमाता जिजाऊ यांच्या दर्शनासाठी येत असतात. मॉ जिजाऊ साहेब यांच्या रुपाने सिंदखेड राजा नगरीला आदर्श माता, पूत्र घडविणारी राष्ट्रमातेची नगरी म्हणून जगभरात दर्जा प्राप्त झाल्याचे सांगून राजमाता जिजाऊ जयंतीच्या शुभेच्छा व्यक्त केल्या.

### विद्युत रोषणाई, फुलांच्या माळांनी सजले मातृतीर्थ



**छत्रपती शिवाजी महाराज यांच्या मातोश्री राजमाता जिजाऊ यांचा आज जन्मदिवस आहे. जिल्ह्यातील सिंदखेडराजा येथील राजे लखुजी जाधव यांच्या राजवाड्यात राजमाता जिजाऊंचा जन्म झाला होता. दरवर्षीप्रमाणे या जन्मस्थळी मोठ्या उत्साहात राजमाता जिजाऊ जन्मोत्सव सोहळा साजरा केला जातो. या सोहळ्यानिमित्त राजमाता जिजाऊंचे जन्मस्थळ असलेला लखुजीराजे जाधव यांचा राजवाड्याची आकर्षक विद्युत रोषणाई आणि फुलांच्या माळांनी सजावट करण्यात आली होती.**



### राजमाता जिजाऊ जन्मोत्सव हा लोकोत्सव व्हावा– कामगार मंत्री ॲड.आकाश फुंडकर

राजमाता जिजाऊ यांच्या जन्मोत्सवानिमित्त कामगार मंत्री ॲड.आकाश फुंडकर यांच्या हस्ते शासकीय पुजा करण्यात आली. त्यावेळी ते माध्यमांशी बोलतांना म्हणाले की, राजमाता जिजाऊ यांच्या जन्मोत्सव हे महाराष्ट्रातील भक्तांसाठी दर्शनाची वर्षभराची शिदोरी असते. दरवर्षीप्रमाणे याही वर्षी दर्शन घेण्यासाठी आलो. राजमाता जिजाऊ जन्मोत्सव हा लोकोत्सव व्हावा यासाठी आगामी काळात प्रयत्न करणार आहोत. लखुजीराजे जाधव राजवाडा या मॉ जिजाऊ जन्मस्थळासंदर्भातील विकास कामांमधील अडचणी दूर करुन आंतरराष्ट्रीय दर्जाचे स्मारक व्हावे यासाठी प्रयत्न करणार आहे. राजमाता जिजाऊ यांच्या जन्मोत्सवाला मुख्यमंत्र्यांच्या हस्ते शासकीय महापुजा करण्यासंदर्भात मंत्रिमंडळात प्रस्ताव मांडण्यात येईल. सिंदखेड राजा विकास आराखड्याला गती देण्यात येईल, असे कामगार मंत्री ॲड.आकाश फुंडकर यांनी यावेळी सांगितले.

### शाळकरी विद्यार्थांमध्येही उत्साह

राजमाता जिजाऊ जन्मोत्सव सोहळ्यात हजारो जिजाऊप्रेमींची गर्दी होती. या सोहळ्यात शाळकरी मुलांनी पारंपरिक वेशभूषेत सहभाग नोंदवला होता. यावेळी मॉ जिजाऊ जन्मोत्सवाचा शाळकरी विद्यार्थांमध्येही उत्साह दिसून येत होता.





# जगातिल एकमेव मी व्यक्ती असा आहे की हातात संविधान घेऊन जन्माला आलोय

## स्वत: स्वत:च्या बळावर उभ राहायला शिका–शिवश्री पुरुषोत्तम खेडेकर

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**सिंदखेड राजा । ज्ञानेश्वर बुधवत**







आज राष्ट्रमाता जिजाऊ जनमोत्सव सोहळ्यात शिवश्री पुरुषोत्तम खेडेकर यांनी शिवधर्म पिठावून उपस्थितांना संबोधित करतांना म्हंटले की,मला सांगताना आनंद होतो की भारतीय संविधानाचे अमृत महोत्सव वर्ष सुरू आहे, आणि माझे सुध्दा अमृत महोत्सव वर्ष सुरू आहे. जगाच्या पाठीवर भारतासह अगदी आपल्या जिल्ह्यातही आणि राज्यातही अनेक लोक तोंडामध्ये सोन्याचे चांदीचे चमचे हातामध्ये चमचे घेऊन जन्माला आलेले आहेत. पण पुरुषोत्तम खेडेकर एकमेव असा आहे की जो हातामध्ये संविधान घेऊन जन्माला आलोय असं म्हणलं तरी हरकत नाही.

केंद्रीय आयुष आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी व्यक्त केलेल्या खंते बद्दल, या जिजाऊ सृष्टीवर नेहमीसारखा गर्दीचा नोट दिसत असला तरी त्यात पाहिजे त्याप्रमाणे मध्ये शिस्त न वाढवता आली. याबद्दल आपल्याला पुढच्या कालखंडामध्ये काम करावं लागणार आहे. आजच्या या ४२७ व्या जिजामातेच्या जयंती निमित्त आणि माझ्या अमृत महोत्सवी सत्कार निमित्त या जिजाऊ सृष्टीवरील या भव्य दिव्य कार्यक्रमाचे सन्माननीय मराठा सेवा संघाचे अध्यक्ष इंजिनिअर विजय घोगरे यांच्या शुभ हस्ते करण्यात आला.

मराठा सेवा संघ हा मी एकट्याने केलेल्या आहे, अशातला काही भाग नाही. छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वराज्याबद्दल बोललं जातं, महाराजा सांगायचे की मी हे स्वराज्य निर्माण केले हे जरी खरं असलं, तरी जीवाची परवा न करता जे मावळे लढले त्यांचे योगदान यामध्ये खूप मोठे आहे. त्याचप्रमाणे तुम्ही सर्वांनी जो काही माझा सत्कार आहे हा एकटा पुरुषोत्तम खेडेकर, रेखाताई खेडेकर, स्वप्निल, सौरभ, स्नेहाचा नाही तर यामध्ये सर्वांचा सिंहाचा वाटा आहे याचा मला अभिमान वाटतो.

आपल्याला सर्वांना पुन्हा पुन्हा सांगतो मी की, स्वतःहून स्वतःच्या बळावर आपण उभा राहिला पाहिजे. मराठा व्यापक शब्द असला तरी काही लोकांना वाटत असेल तर पुन्हा पुन्हा मी सांगतो की, यापूर्वी सुद्धा सांगितलं की जग असेल, राष्ट्र असेल, तुमचे नात्यागोते असतील, त्याची काळजी करू नका. पण एक ठरवा की काही झाले तरी मी शारीरिक, मानसिक, बौद्धिक, आर्थिक आणि अध्यात्मिक अंगाने आजची जिजाऊ होईल, आजचा शिवाजी होईल आणि आज डोंगरावर न राहता उद्याचं माझं पाऊल कदाचित मंगळावर राहील, चंद्रावर राहील, शनिवर राहील ही खात्री तुम्ही स्वतः स्वतःला दिली पाहिजे, तुका म्हणे नाही मोक्षाचे दागिने कोणीतरी येईल आणि तुमचे कल्याण करेल हे दिवस आता संपलेले आहे.

सदरील जिजाऊ जन्मोत्सवासाठी केंद्रीय आयुष आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री खासदार प्रतापराव जाधव, जालन्याचे आमदार अर्जुनराव खोतकर, मेहकरचे आमदार सिध्दार्थ खरात, सिंदखेड राजा चे माजी आमदार शशिकांत खेडेकर, चीखलीच्या माझी आमदार रेखाताई खेडेकर व मराठा सेवा संघ, संभाजी ब्रिगेड, जिजाऊ ब्रिगेड चे महाराष्ट्रभरातून आलेले कार्यकर्ते उपस्थित होते. कार्यक्रमासाठी राज्याच्या कानाकोपऱ्यातून आलेल्या जिजाऊ भक्तांनी मोठ्या प्रमाणात गर्दी जमली होती.

# राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या जयंती निमित्त उद्योजकता प्रेरणा कार्यक्रम

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**देऊळगाव राजा । ज्ञानेश्वर बुधवत**

डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला संलग्नित समर्थ कृषी महाविद्यालय, देऊळगाव राजा येथे राजमाता राष्ट्रमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद जयंती निमित्ताने जल्लोषाचे वातावरण होते. विविध कार्यक्रम व भाषणे यांचे आयोजन करून राजमाता जिजाऊच्या कार्याची आठवण करण्यात आली.

या कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून डॉ. नितीन मेहेत्रे, प्राचार्य समर्थ कृषी महाविद्यालय देऊळगाव राजा तसेच प्रमुख पाहुणे म्हणून सतेज डोणगावकर न्यू कृषी मित्र सेवा केंद्र देऊळगाव राजा, प्रतीक पारिक, दुग्ध व्यवसाय उद्योजक देऊळगाव राजा, अनिकेत शिंदे, शिवगंगा सीड्स कंपनी देऊळगाव राजा, रीतिमा गुप्ता, कुंजल पारिक, प्रा. अश्विनी जाधव, प्रा. किरण ठाकरे, प्रा. योगेश जगदाळे हे उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात राजमाता जिजाऊ व कर्मयोगी स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेचे पूजन व दीप प्रज्वलाने झाली. राजमाता जिजाऊ यांचे नाव मराठी इतिहासात सुवर्ण अक्षरांनी कोरलेले आहे. त्यांचा जन्म १२ जानेवारी १५९८ रोजी सिंदखेड राजा येथे झाला. जिजाऊंनी बालपणापासूनच शौर्य,धैर्य आणि बुद्धिमत्ता या गुणांचे प्रदर्शन केले तसेच स्वामी विवेकानंद यांनी आपले संपूर्ण जीवन सामाजिक कार्यासाठी अर्पित केले. त्यांनी केलेली कामे ही युवकांसाठी प्रेरणा देणारी आहे. ते भारतीय संन्यासी आणि तत्त्वज्ञ होते.




विद्यार्थ्यांनी राष्ट्रमाता जिजाऊ व कर्मयोगी स्वामी विवेकानंद यांच्या जीवनावर आपल्या मनोगताद्वारे प्रकाश टाकला. त्यामध्ये विद्यार्थिनी वैष्णवी गोळे, साक्षी तायडे ,सुमित पवार, दुर्गा मापारी, श्वेता पवार व हिमांशू कडू यांनी उत्साहाने सहभाग दर्शविला. राष्ट्रमाता जिजाऊ आणि स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीनिमित्त एक विशेष उद्योजकता प्रेरणा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमात प्रमुख मार्गदर्शक म्हणून सतीश डोणगावकर आणि प्रतीक पारिक या यशस्वी उद्योजकांनी आपल्या अनुभवाची मांडणी केली. कार्यक्रमात विद्यार्थ्यांना उद्योजक बनवण्यासाठी प्रोत्साहित करण्यात आले तसेच उद्योग सुरू करण्यासाठी आवश्यक असलेल्या मुद्द्यांवर मार्गदर्शन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी या कार्यक्रमात उत्साह पूर्वक सहभाग घेतला. कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. नितीन मेहेत्रे यांनी राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या जीवनावर प्रकाश टाकत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. त्याचबरोबर रासेयो सह कार्यक्रम अधिकारी प्रा. अश्विनी जाधव यांनी विद्यार्थ्यांना मासाहेब जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या जीवनाचे अवलोकन करण्यास प्रेरित केले. हा कार्यक्रम यशस्वीपणे आयोजित करण्यात रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. किरण ठाकरे व योगेश जगदाळे यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. संपूर्ण कार्यक्रमाच्या सूत्रसंचालनाची धुरा ऋतुजा बनकर यांनी सांभाळली व आभार प्रदर्शन ऋतुजा वाघ यांनी केले.

# उस्माननगर पत्रकार संघाच्या वतीने आमदार चिखलीकर यांना विविध मागण्यांचे निवेदन

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**उस्माननगर । गणेश लोखंडे**

उस्माननगर सह परिसरातील अनेक प्रलंबित विकासकामे तातडीने पूर्ण करावीत यासाठी लोहा विधानसभा मतदारसंघाचे आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांना उस्माननगर विभाग ग्रामीण मराठी पत्रकार संघाच्या वतीने रविवारी ( दि. १२) रोजी विविध मागण्यांचे निवेदन देण्यात आले. उस्माननगर येथील समता विद्यालयाच्या प्रांगणात सेवा पूर्ती कार्यगौरव सोहळ्याला प्रमुख पाहुणे म्हणून आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर उपस्थित होते. आमदार झाल्यानंतर पहिल्यांदा आमदार चिखलीकर यांच्या उस्माननगर भेटीत पत्रकार संघाच्या वतीने विविध मागण्यांचे निवेदन देण्यात आले. यात राज्याच्या आगामी जिल्हा व तालुका पुनर्रचना करण्यात येत असताना उस्माननगर गावाला तालुक्याचा दर्जा देण्यात यावा. उस्माननगर येथील प्राथमिक आरोग्य




केंद्राला ग्रामीण रुग्णालय ची श्रेणी वाढ द्यावी. पत्रकार सभागृह साठी अभ्यासिका इमारत उभारण्यासाठी निधी उपलब्ध करून द्यावा. राष्ट्रीय महामार्गावरील उस्माननगर येथील उदासीबुवा चौकात अद्ययावत प्रवासी निवारा व वीजपुरवठा करण्यात यावा. उस्माननगर- शिराढोण- भूत्याचीवाडी संयुक्त वाढीव ग्रामीण पाणीपुरवठा योजना तातडीने पूर्ण करण्यात यावी. तसेच डॉ. शंकरराव चव्हाण विष्णूपूरी प्रकल्पाच्या शिराढोण उपसा जलसिंचन योजनेतील उस्माननगर वितरीकेचे काम पूर्ण करण्यात यावे. या मागण्यांचे निवेदन आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांना देण्यात आले. यावेळी बोलताना आमदार चिखलीकर यांनी पाणी पुरवठा योजना साठी लवकरच जिल्हाधिकारी कार्यालयात बैठकीत निर्णय घेण्यात येईल. विकासकामांना गती देण्यात येईल. सांगितले. यावेळी पत्रकार संघाचे अध्यक्ष गणेश लोखंडे, उपाध्यक्ष माणिक भिसे, सचिव प्रदीप देशमुख, कोषाध्यक्ष लक्ष्मण कांबळे, अमजद पठाण, देवीदास डांगे, लक्ष्मण भिसे, संभाजी कांबळे, सूर्यकांत मालीपाटील यांची उपस्थिती होती.

# 'गंगाई- बाबाजी' राज्यस्तरीय आदर्श पुरस्कारासाठी प्रस्ताव पाठवण्याचे आवाहन

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी । अण्णासाहेब साबळे**

शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळ, आष्टीचे संस्थापक- अध्यक्ष माजी आमदार भीमराव धोंडे यांच्या आई-वडिलांच्या स्मृतीप्रित्यर्थ मागील २० वर्षापासून येथील भगवान महाविद्यालयामध्ये 'गंगाई- बाबाजी' महोत्सवाचे आयोजन करण्यात येते. या महोत्सवामध्ये विविध क्षेत्रांमध्ये उल्लेखनीय काम करणाऱ्या मान्यवरांना 'गंगाई -बाबाजी राज्यस्तरीय आदर्श पुरस्काराने' मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात येते. यावर्षी ३० जानेवारी २०२५ ते १ फेब्रुवारी २०२५ या कालावधीमध्ये आयोजित करण्यात आलेला 'गंगाई- बाबाजी महोत्सव' मोठ्या उत्साहात साजरा होणार आहे. या महोत्सवामध्ये महाविद्यालयीन वक्तृत्व , काव्यवाचन स्पर्धा व खुल्या लावणीनृत्य स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे.

१ फेब्रुवारी २०२५ रोजी विविध क्षेत्रामध्ये उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांना 'गंगाई -बाबाजी राज्यस्तरीय आदर्श पुरस्काराने' सन्मानित करण्यात येणार आहे.

यामध्ये 'आदर्श माता- पिता, धार्मिक क्षेत्र, सामाजिक क्षेत्र, साहित्य क्षेत्र, कला क्षेत्र, कृषी क्षेत्र, शिक्षण क्षेत्र (प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक व महाविद्यालयीन), क्रीडा क्षेत्र, पत्रकारिता, आदर्श ग्रामविकास अधिकारी, आदर्श तलाठी व आदर्श सरपंच या

क्षेत्रांचा समावेश आहे. या क्षेत्रापैकी कोणत्याही क्षेत्रामध्ये उल्लेखनीय कार्य असणाऱ्या मान्यवरांनी सोमवार दिनांक २० जानेवारी २०२५ पर्यंत आपले प्रस्ताव भगवान महाविद्यालय, आष्टी येथे सादर करावेत, असे आवाहन संयोजन समितीच्या वतीने करण्यात आलेले आहे. या संदर्भातील अधिक माहितीसाठी आपण डॉ.दत्तात्रय वाघ (प्राचार्य-९४२३७१६८५२), डॉ. ज्ञानदेव वैद्य (उपप्राचार्य-९४२३७१६८५९) व डॉ. आप्पासाहेब टाळके (उपप्राचार्य-९४२१४४३५९०) व डॉ.आबासाहेब पोकळे (९७६३४३४५४६)यांच्याशी संपर्क साधावा असे महाविद्यालयाच्या वतीने कळविण्यात आलेले आहे.

# पुण्यात तरुणीला मारल्याची वाईट घटना घडली राज्यात हे सर्वत्र सुरू-पंकजा मुंडेंचा दावा

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**छत्रपती संभाजीनगर । वृत्तसंस्था**

पुण्यात तरुणीला मारल्याची एक वाईट घटना घडली. सध्या राज्यात सगळीकडेच अशा घटना घडत आहेत. त्यामुळे भांडण अथवा खून आदी घटनांवरून राजकारण करणाऱ्यांसाठी सध्या मोठी संधी आहे, असे मत राज्याच्या पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांनी शनिवारी बीडमधील संतोष देशमुख हत्याकांवर भाष्य करताना व्यक्त केले. सुरेश धस यांच्यामुळे बीडची बदनामी होत असल्याचा आरोपही त्यांनी यावेळी केला.

पंकजा मुंडे छत्रपती संभाजीनगरमध्ये पत्रकारांशी बोलताना म्हणाल्या, संतोष देशमुख हत्याकांडातील आरोपींना मकोका लावण्यात आल्याची माहिती माझ्याकडे नाही. त्यामुळे मी त्यावर काय प्रतिक्रिया देऊ? मुख्यमंत्र्यांनी निर्णय घेतला असेल तर तो योग्यच आहे. तपासावर बोलणे योग्य ठरणार नाही. पुण्यात काल एक वाईट घटना घडली. एका तरुणीला ठार मारण्यात आले. हे सगळीकडेच घडत आहे. कोणतीही घटना घडते. भांडण अथवा खून याचे ज्यांना राजकारण करायचे आहे त्यांच्यासाठी ही संधी आहे.



उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी धनंजय मुंडे यांच्या राजीनाम्यावर प्रतिक्रिया दिली आहे. त्यावर मी काउंटर करणार नाही. शोध लागेपर्यंत कारवाई करणार नाही असे ते म्हणालेत. ते असे म्हणत असतील तर मी रोज काय बोलू? आमदार सुरेश धस यांच्यावर मी काय बोलू? मी कुठे गप्प आहे. मी स्वतः या प्रकरणी पहिल्यांदा एसआयटीची मागणी केली होती. माझ्या बोलण्यामुळे राज्य हलले असते तर आता जे ते बोलत आहेत, ते पूर्वी का बोलले नाही. मागच्या २ वर्षांत का बोलले नाही. त्यांच्यामुळे बीड बदनाम होत आहे. त्यांनी राजकीय भूमिका न घेता हा विषय संवेदनशीलपणे समजून घेतला असता तर बीडची अशी बदनामी झाली नसती.आमच्या जिल्ह्यात स्वाभिमानी लोक आहेत. मी महिला राजकारणी म्हणून तिथे काम करते. सर्वात कष्टाचे जीवन असणारे लोक आमच्या जिल्ह्यात आहेत. आम्ही काम करतो. आता सांगितली जात आहे तशी स्थिती असती तर आम्ही दरोडे टाकायला गेलो असतो ना? अशा घटनेने जिल्हा बदनाम होत असेल तर आरटीआयमधून माझ्याकडे सर्व जिल्ह्यांची माहिती आहे. नागपूरची घटना काय, पुण्याची काय असे सगळीकडेच घडत आहे. विशेषतः मी पर्यावरण मंत्री आहे. त्यामुळे मी या विषयावर काय बोलणार. मुख्यमंत्री या प्रकरणी योग्य ती भूमिका मांडत आहेत, असे पंकजा मुंडे म्हणाल्या.पंकजा पुढे म्हणाल्या, मी माझ्या विभागाची बैठक घेत आहे. माझ्या खात्याला बळ देण्याचे काम करत आहे. मी उगीच आपल्या अधिकाऱ्यांना झापले वगैरे नाही. मी त्यांना समजून घेतले. माझे मागे अशीच गर्दी आहे. कमी जास्त असे काही झाले नाही. प्रदूषण हा विषय राज्यापुरता नाही तर जागतिक पातळीवरचा विषय आहे. मी देश व परदेश सगळीकडून मार्गदर्शन घेत आहे.

# संजय राऊत यांचे संतुलन बिघडले:तर मुख्यमंत्रीपदाचे स्वप्न पाहणारे आता घरी बसले-मंत्री राधाकृष्ण विखे पाटील

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**मुंबई (वृत्तसंस्था)**

नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीत जनतेने महाविकास आघाडीतील तिन्ही पक्षांना नाकारले आहे. मात्र, आता हे तिन्ही पक्ष स्वतंत्र निवडणूक लढो किंवा एकमेकांच्या डोक्यावर बसून लढो, याची आम्हाला चिंता नसल्याचे जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी म्हटले आहे. विखे पाटील यांनी या माध्यमातून खासदार संजय राऊत यांनी दिलेल्या स्वबळाच्या नाऱ्यावर टीका केली आहे. आम्हाला विधानसभा निवडणुकीमध्ये ज्याप्रमाणे विजय मिळाला, तसाच विजय स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये देखील मिळणार असल्याचा दावा देखील विखे पाटील यांनी केला आहे.

संजय राऊत यांना केवळ मुद्दा हवा असतो. त्यांनी आता स्वतःचे अस्तित्व गमावले आहे. राऊत यांचे संतुलन बिघडले असल्याचा आरोप देखील विखे पाटील यांनी केला. संजय राऊत यांचे माझ्यावर विशेष प्रेम आहे. त्यांचे संतुलन बिघडण्याचे विखे पाटील यांनी म्हटले आहे. संजय राऊत यांनी महाविकास आघाडीच्या माध्यमातून निवडणुकीला सामोरे न जाता उद्धव ठाकरे यांचा शिवसेना पक्ष स्वबळावर आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणूक लढणार असल्याची घोषणा केली आहे. या घोषणेनंतर आता राज्यातील राजकारण चांगलेच तापले आहे. त्यात भाजपने देखील स्थानिक स्वराज्य संस्थांतील निवडणुकांमध्ये मोठे यश मिळणार असल्याचा दावा विखे पाटील यांनी केला आहे. महाविकास आघाडीची बिघाडी होण्यास जास्त वेळ लागणार नसल्याचे मी या आधी देखील सांगितले होते. आघाडी ही भूमिका आणि तत्व यासाठी एकत्र आलेले नाही. तर केवळ सत्तेत येण्यासाठी महाविकास आघाडीतील पक्ष एकत्र आले होते. त्यासाठी कोणी हिंदुत्व बाजूला सोडले तर कोणी आपल्या विचारधारेला बाजूला ठेवले असल्याची टीका राधाकृष्ण विखे पाटील यांनी केली आहे.

# मिनकी येथील दुहेरी आत्महत्याग्रस्त कुटुंबाला वंचित बहुजन आघाडीच्या वतीने सांत्वन पर भेट

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**बिलोली । गौतम गावंडे**

गरीबी आणि शिक्षणाच्या बाजारीकरणाला बळी पडलेल्या बिलोली तालुक्यातील मिनकी येथील पीडित पैलवार कुटुंबाला आज वंचित बहुजन आघाडीच्या वतीने भेट देऊन सांत्वन करण्यात आले. मिनकी येथील बाप लेकाने आत्महत्या केलेल्या घटनेला आज तब्बल चार दिवस उलटून गेले असले तरी कुठल्याही लोकप्रतिनिधींनी या पीडित कुटुंबाला भेट दिली नसल्याची कैफियत या कुटुंबातील सदस्यांनी वंचित बहुजन आघाडीचे राज्य प्रवक्ते फारूक अहमद आणि जिल्हाध्यक्ष शिवाभाऊ नरंगले यांचेसमोर व्यक्त केली. आज वंचित बहुजन आघाडीच्या वतीने मिनकी येथील मयत राजेंद्र पैलवार, ओमकार पैलवार यांच्या कुटुंबांना भेट दिली. यावेळी वंचित बहुजन आघाडीच्या वतीने या पिढीत कुटुंबाला या दुखातून सावरण्यासाठी तातडीची आर्थिक मदतही करण्यात आली.

यावेळी वंचित बहुजन आघाडीचे महासचिव शाम कांबळे , जिल्हा उपाध्यक्ष शंकर महाजन, तालुका अध्यक्ष धम्मदीप गावंडे यांची उपस्थिती होती. सातत्याने नैसर्गिक आपत्ती आणि सरकारचे शेतकऱ्यांविषयी असलेले उदासीन धोरण यामुळे शेतकऱ्यांची परिस्थिती त्यातही अल्पभूधारक शेतकऱ्यांची स्थिती अगदीच हालाखीची झाली आहे. शिक्षणासाठी गाव सोडून लेकरांना पन्नास- शंभर किलोमीटर



दूर अंतरावर शिकायला ठेवले. सणासुदीच्या निमित्ताने मुलं घरी आली. मुलांनी शिक्षणासाठी लागणाऱ्या साहित्याची मागणी केली. अंगावर नवीन कपडे असावे अशा मुलांनी वडिलांकडे आग्रह केला, परंतु आर्थिक हातलब असलेल्या बापाला मुलाच्या अत्यावश्यक व अगदी किरकोळ असलेल्या मागण्या देखील पूर्ण करता आले नाहीत. दहावीत शिकणाऱ्या ओमकार याने ही बाब मनाला लावून घेतली. आणि सकाळी शेतात जाऊन त्याने गळफास घेतला. थोड्यावेळाने शेतात गेलेल्या राजेंद्र पैलवार या त्याच्या वडिलांनी शेतात आपला मुलगा झाडाला लटकला आहे हे लक्षात येताच त्याला खाली उतरून पश्चातापाच्या व एकूणच आर्थिक तंगीला कंटाळून त्यानेही मला पाठोपाठ गळफास घेतला. ही बाब महासत्ता बनू पाहणाऱ्या इथल्या व्यवस्थेला केवळ चपराक नाही तर ती आत्मपरीक्षण करण्यास भाग पाडणारी आहे. आज वंचित बहुजन आघाडीच्या शिष्टमंडळाने या पीडित कुटुंबाला भेट देऊन त्यांचे सांत्वन केले जमेल ती आर्थिक मदत केली आणि आगामी काळात मयत ओंकार यांच्या भावंडांच्या शिक्षणासाठी लागेल ती मदत करण्याचे आश्वासन दिले.

# मध्य रात्री वाळू चोरी करणारे दोन ट्रॅक्टर पकडले

## तहसीलदार किशोर यादव यांच्या मार्गदर्शनाखाली नायब तहसीलदार कैलास जेठे यांची मध्य रात्री धडक कारवाई

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**माहूर । राजकिरण देशमूख**

जिल्हाधिकारी अभिजीत राऊत सहाय्यक जिल्हाधिकारी मेघना कावली तसेच तहसीलदार किशोर यादव यांचे मार्गदर्शनाखाली महाकाल उर्फ नायब तहसीलदार कैलास जेठे यांची वाळू तस्करा विरोधात धडक मोहीम सुरच असून त्यांनी दि १० रोजी मध्य रात्री मौजे बोंडगव्हाण तसेच पडसा येथून वाळू चोरी करणारे दोन ट्रॅक्टर पकडून तहसील कार्यालयात जमा केल्याची घटना घडली असून वाळू तस्कर महाकालच्या धसक्याने अंधार रात्रीचा फायदा घेत वाहनांचे लाईट बंद करून वाळू चोरी करत असल्याने महाकाल उर्फ नायब तहसीलदार कैलास जेठे हे विविध प्रकारचे वेषांतर करून या कारवाया करत असल्याने वाळूतस्करांची तब्बल ३२ वाहने जप्त करण्यात आलेली आहेत

वाळू तस्करांची याआधी ३० वाहने जप्त करून तहसीलदार किशोर यादव नायब तहसीलदार तथा महाकाल कैलास जेठे नायब तहसीलदार डॉ राजकुमार राठोड यांनी जरब निर्माण केला असून अर्ध्या रात्री छुप्या पद्धतीने तसेच लाईट बंद करून विना नंबरच्या वाहनाद्वारे चोरी वाळू चोरी करणारी वाहने पकडल्याने वाळू तस्करात जबरदस्त दहशत निर्माण झाली असून जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांनी तहसीलदारांना अग्नीशास्त्र दिल्यास वेळ प्रसंगी त्यांनी वाळू तस्करांना गोळ्या घालण्यासही मागे



पुढे पाहणार नसल्याचा इशारा त्यांनी याआधीच दिला असून तरीही काही तस्कर नदीपात्रातून विना नंबरच्या वाहनांचे लाईट बंद करून वाळू चोरी करत असल्याची माहिती मिळाल्याने महाकाल उर्फ नायब तहसीलदार कैलास जेठे यांनी वेशांतर करून मौजे बोंडगव्हाण आणि पडसा येथून चोरीची वाळू घेऊन जाणारी वाहने पकडल्याने वाळू तस्करांनी आपापली वाहने बिळात लपवून ठेवल्याचे चर्चा सुरू झाली आहे जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांनी वाळू तस्करी करणाऱ्यावर मोक्का अंतर्गत कारवाई करण्याची परवानगी देत वाळू तस्करावर तडीपारची कारवाही करावी अशी मागणी होत असून सहाय्यक जिल्हाधिकारी मेघनाकावली यांच्या आदेशानुसार तहसीलदार किशोर यादव यांनी तयार केलेल्या पथकात महाकाल उर्फ नायब तहसीलदार कैलास जेठे ,एस के साळसुंदर मंडळ अधिकारी, ओमप्रकाश तवर, ओंकार धनवे , प्रदीप कदम, सुमीत नैताम, अभिजीत कुडमते, साहेबराव गावंडे, तलाठी ग्राम महुसल अधिकारी तसेच महसूल सेवक दिपक लोखंडे व सागर हिवाळे यांचे सह कोतवाल आणि कर्मचाऱ्यांनी मोलाची कामगिरी बजावली

# दर्पण संपादक पत्रकार संघाची कार्यकारणी गठीत अध्यक्ष पदी डॉ.अय्युब खान पठाण तर सचिव पदी सतीश कोल्हे



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**उमरखेड । सय्यद रहीम राजा**

उमरखेड येथे आज दिनांक ६ जानेवारी रेस्ट हाऊस येथे मराठी पत्रकारीतेचे जनक बाळशास्त्री जांभेकर याच्या जयंती निमित्त दर्पण संपादक पत्रकार संघाची कार्यकारणी गठीत करण्यात आली. अध्यक्ष पदी डॉ.अय्युब खान पठाण तर सचिव पदी सतिश कोल्हे. यांची निवड करण्यात आली.उपाध्यक्ष पदी शेख मदार मॉंलाना. कार्याध्यक्ष पदी डॉ.आंबेजोगाईकर सहसचिव पदी दिगांबर मनवर सल्लागार चुनुमियाँ काझी जगीरदार सदस्य पदी शैख निसार पेंटर शेख जमीरभाई सदस्य पदी बंडू पाटील कदम सदस्य पदी सुभाष वाघाडे सदस्य पदी सय्यद रहिम राजा सदस्य पदी बालराज काळबांडे सदस्यपदी कैलास आढागळे सदस्य पदी बुद्धघोष ढोले सदस्य पदी यांची निवड करण्यात आली या कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विशेष प्रयत्न केले या वेळी सर्व मान्यवरांनी मनोगत व्यक्त केले.

# सुकळी ज.येथे राजमाता जिजाऊ जयंती साजरी

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**सुकळी जहागीर । सय्यद रहीम राजा**

सुकळी (जहागीर) येथे ग्रामस्थाच्या वतीने राजमाता जिजाऊ यांची जयंती मोठया उत्सवात साजरी करण्यात आली मंदिराच्या भव्य प्रांगणात मासाहेब जिजाऊ यांच्या प्रतिमेचे गावकऱ्याच्या असते पूजन करून राजमाता जिजाऊ प्रतिमेस पुष्पहार घालून पूजन करण्यात आले त्यांना विनम्र अभिवादन करण्यात आले. यावेळी अनेकांची उपस्थिती या कार्यक्रमास सुकळी (जहागीर) येथील सरपंच शिवाजीराव रावते नागेश वानखेडे



विष्णू वानखेडे आदिनाथ वानखेडे रवीकुमार वानखेडे मंगेश वानखेडे अक्षय वानखेडे सोमकांत नरवाडे दत्ता वानखेडे उमेश वानखेडे निलेश वानखेडे गजानन वानखेडे अमोल वानखेडे विठ्ठल वानखेडे विष्णुदास वानखेडे मंगेश दहेकर विशाल वानखेडे. गावकरी उपस्थित होते.

# उमरी येथे स्वातंत्र्य सैनिकांच्या वारसांची बैठक संपन्न

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**उमरी । महेश पडोळे**

उमरी येथील गिरीष भाऊ गोरठेकर सभागृह या ठिकाणी स्वातंत्र्य सैनिकांच्या वारसांची बैठक घेण्यात आली. स्वा. सै. जानकाबाई सत्य नारायण माने यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आलेल्या या बैठकीत खालील मागण्यावर चर्चा करण्यात आली.१)स्वा. सै. वारसांना स्वातंत्र्य सैनिकांच्या हयातीनंतर पेन्शन मिळणे,२) शासकीय सेवेत स्वतंत्र सैनिकांच्या वारस पाल्य व नातवांना नोकरी देन्यात यावी,३) हुतात्मा स्मारकावर पंचधातू प्रेरणाज्योत व स्मारकाचे सुशोभीकरण करण्यात यावे.४) स्वातंत्र्य सैनिकांचे वारस भूमिहीन आहेत त्यांना गायरान जमीन देण्यात यावी .५) स्वा. सैनिकानी केलेल्या कामाचे स्मरण म्हणून शासकीय शाळा व शासकीय इमारतींना स्वातंत्र सैनिकांचे नाव देण्यात



यावे.६) स्वातंत्र्य सैनिकांच्या वारसांना मालमत्ता करातून सूट देण्यात यावी अशा प्रकारच्या मागण्या बद्दल या बैठकीमध्ये चर्चा करण्यात आली सदर बैठकीचे आयोजन गोविंद पाटील गोळेगावकर यांनी केले. या बैठकीस उपस्थित शिरीष भाऊ देशमुख गोरठेकर, सुभाष पेरेवार, गंगाधर पोलादवार, बाबू ठाकूर, सुनील गळगे, सुंदरबाई शिरसागर, शंकर माने , दिलिप सावकार.यांसह आदी स्वा. सैनिकांचे वारसदार उपस्थीत होते.

## सिध्दनाथ येथे अखंड हरिनाम सप्ताह

# श्री ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण व श्रीराम कथेचे आयोजन

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**नांदेड । बाजीराव गायकवाड**

श्री शिवानंद स्वामी देवस्थान सिद्धनाथ ह.भ.प. श्री किशन महाराज बरबडेकर यांच्या प्रेरणेने २१ व्या वर्षी शुभारंभ मि.पौष कृ.८, शके १९४६ बुधवार, दि.२२/०१२०२५ अखंड हरिनाम सप्ताह व श्री ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण व श्रीराम कथा सोहळा मौजे सिद्धनाथ ता. जि. नांदेड श्री शिवानंद स्वामी तिर्थक्षेत्र, सिद्धनाथ नांदेड. सांगता मि.पौष आमावस्या, शके १९४६ बुधवार, दि.२९/०१/२०२५ काल्याचे कीर्तन ह.भ.प.श्री वैजनाथ महाराज थोरात, हिंगोली दि.२२ ते २८ जानेवारी २०२५ पर्यंत दु. १ ते ४ वाजेपर्यंत सातसंगीत – श्री सुधीर म. पळशीकर ह.भ.प.श्री वैजनाथ महाराज थोरात, हिंगोली बुधवार, दि.२९ जानेवारी २०२५ सकाळी ९ ते ११ वा. यांचे काल्याचे कीर्तन सप्ताहातील दैनंदिन कार्यक्रम पहाटे ४ ते ५ काकडा,६ ते ७ विष्णुसहस्त्रनाम, ७ ते ११ ज्ञानेश्वरी पारायण, ११ ते १२




गाथा भजन, १ ते ५ श्रीराम कथा, सायं. ६ ते ७ हरिपाठ, रात्री ९ ते ११ हरिकिर्तन.पालखी सोहळा मंगळवार, दि.२८/०१/२०२५ दुपारी १ वा. श्री शिवानंद स्वामी महाराज यांच्या पादुकांची मिरवणूक निघेल आमावस्या, बुधवार, दि.२९/०१/२०२५ सकाळी महाप्रसाद (भंडारा) गावकरी मंडळी मौजे सिद्धनाथ ता.जि. नांदेड व्यवस्थापक सिद्धानाथ, नागापूर, पुणेगाव, पुयडवाडी, वांगी, आमदुरा, बासरी, मुगट, वडगाव, मिश्री पिंपळगांव कार्यक्रम स्थळ : श्री शिवानंद स्वामी तिर्थक्षेत्र सिद्धनाथ टिप : पुणेगाव स्टॉपपासुन शिवानंद स्वामी कमान महाद्वारापासून उत्तरेस १ कि. मी. अंतरावर श्री शिवानंद स्वामी देवस्थान आहे.

सिद्धनाथ बस स्टॉप कमान पासुन शिवानंद स्वामी संस्थान ॲटो चालु आहेत दि.२६/१/२०२५ रोजी व्यंकटी ग्यानोजी आवातिरक पोलीस पाटील सिध्दनाथ यांची पंगत आहे.अशी माहिती त्यांनी आमच्या प्रतिनिधींशी बोलताना दिली आहे.

# मानोविकास फाऊंडेशनच्या राष्ट्रीय अध्यक्षपदी श्रीरामवार

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**उमरी । महेश पडोळे**

उमरी मानोविकास सामाजिक सेवा फाऊंडेशन च्या राष्ट्रीय अध्यक्षपदी दादासाहेब ऊर्फ रूपेशकुमार गजानन श्रीरामवार यांची फाऊंडेशन च्या नुकतीच पार पडलेल्या विशेष कार्यकारणी सभेच्या बैठकीत सर्वानुमते ठराव मंजूर करुन राष्ट्रीय अध्यक्षपदी दादासाहेब ऊर्फ रूपेशकुमार गजानन श्रीरामवार यांची नियुक्ती करण्यात आली आहे. मूळचे नांदेड जिल्ह्यातील उमरी तालुक्याचे रहिवाशी असलेले श्रीरामवार यांना शैक्षणिक जीवना पासूनच सामाजिक कार्याची आवड असून गेले दहा वर्षे ते सामाजिक कल्याणासाठी झटत आहेत. अन्याया विरोधात लढण्यासाठी ते नेहमीच तत्पर असतात. बालशिक्षा जनजागृती चवळीतही त्यांचे सक्रिय योगदान आहे. जनतेसाठी मोफत विधी सहाय्य सहकार्य, महाराष्ट्रातील शोषित, वंचित, संघटित व असंघटित बांधकाम कामगारांना शासनाच्या वतीने वीट बांधकाम व दगड बांधकाम कामगारांना अटल मध्यान भोजन योजनेची प्रत्यक्ष अंमलबजावणी करत १६० कामगारांना भोजन योजनेचा व निराधार व दिव्यांग व्यक्तींना प्रत्यक्ष शासकीय योजनेचा लाभ मिळवून दिला. मोफत नेत्र तपासणी



व शस्त्रक्रिया, सर्व रोग निदान शिबिराच्या माध्यमातून अनेक लोकांचे सकार्य केले आहे. राष्ट्रीय ग्रामीण विकास पंचायत राज भारत सरकार चे प्रशिक्षण घेत दुर्गम आदिवासी ग्रामीण भागात समाजा मध्ये जनगगृतीचे शासवत ग्रामीण विकास जनजागृतीचे कार्य करत आहेत.

संघटनेच्या माध्यमातून गेल्या अनेक वर्षा मध्ये सहकारी सदस्याच्या माध्यमातून शैक्षणिक, सामाजिक, कौटूबिक, न्याय यंत्रणे मार्फत जनतेस प्रोत्साहित करत भारतीय राज्यघटनेने प्रदान केलेल्या आपल्या अधिकाराप्रती जनजागृतीचे कार्य केले. जनसामान्याचे प्रश्न प्रकरणे प्रशासन स्तरावर सर्वा सामान्य माणसांचे अधिकार व त्यांना अनुसरून दैनंदिन व जिवनावश्यक वैवसायीक कार्य मध्ये येणाऱ्या अडचणी दूर करण्यासाठी त्यांना विनामुल्य मदत करणे संबंधित शासकीय व निमशासकीय विभागाशी संपर्क साधून त्यांना न्याय मिळवून देणे सामाजिक राष्ट्रीय कार्यत राष्ट्रीय आपत्ती नैसर्गिक आपत्ती च्या काळा मध्ये स्वतः सहकारी सदस्य यांना प्रत्यक्ष सोबत घेऊन परिस्थितीला सामोरे गेले. समाजामध्ये बालक, स्त्रियांचे तसेच दिव्यांगाचे मानवाधिकार हनन मोठ्या प्रमाणात होत आहे. आपल्या हक्काबाबत जागृत होऊन याविरुद्ध आयोगाकडे दाद मागण्यास पुढाकार घ्यायला हवा. ज्येष्ठ नागरिकांनीही त्यांचे हक्काचे उल्लंघन होऊ नये, यासाठी जागरूक असले पाहिजे.सामाजिक परिस्थितीला बांधील राहून जेकार्य केले तसेच कार्य पुढील काळात ही करण्याचे व राष्ट्रीय,राज्य, जिल्हा, गांव स्तरा पर्यंत संघटन बांधणीचे कार्य करण्याचा मानस राष्ट्रीय अध्यक्ष श्रीरामवार यांनी वार्ताहार यांच्याशी बोलतांना प्रतिक्रिया व्यकत केली. त्यांच्या निवडीचे सर्व स्तरांतून अभिनंद होत आहे.

## मदत व पुनर्वसन निधीच्या योग्य वापराबाबत प्रश्नचिन्ह

# मिनकी येथील आत्महत्याग्रस्त कुटुंबाचा कडवट अनुभव

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**बिलोली । गौतम गावंडे**

मौ.मिनकी ता.बिलोली जिल्हा नांदेड येथील शेतकरी आत्महत्या ही महाराष्ट्रातील ग्रामीण भागातील गंभीर समस्या असून दरवर्षी अनेक शेतकऱ्यांना कर्जबाजारीपणामुळे व अन्य संकटांमुळे आपले जीवन संपवावे लागते. अशा वेळी आत्महत्याग्रस्त कुटुंबांना तातडीने आर्थिक व मानसिक आधार मिळणे अत्यंत आवश्यक असते. परंतु, नुकत्याच घडलेल्या मिनकी गावातील पितापुत्रांच्या दुर्दैवी आत्महत्येनंतर या कुटुंबाच्या मदतीसाठी झालेले प्रयत्न हे केवळ वरवरचे असल्याचे समोर आले आहे.

मिनकीतील या दुर्दैवी घटनेनंतर संबंधित कुटुंबाला मदत करण्याची जबाबदारी स्थानिक आमदार व खासदारांची होती. मदत व पुनर्वसन मंत्रालयाकडून उपलब्ध असलेला निधी थेट कुटुंबाला २४ तासांच्या आत देऊन त्यांना दिलासा देता आला असता. परंतु, असे न करता आमदार साहेब व खासदार साहेब तहसीलदार साहेब व जिल्हाधिकारी साहेबांना पत्र लिहून मदतीची शिफारस केली. अशा प्रकारची प्रक्रिया वेळखाऊ असल्याने कुटुंबाला तातडीचा आधार मिळालाच नाही. आत्महत्याग्रस्त कुटुंबासाठी थेट मदतीऐवजी प्रशासनाच्या माध्यमातून पत्रव्यवहार करणे, हे

**तहसीलदार व जिल्हाधिकारी यांच्यावर शिफारस टाकणे ही लोकप्रतिनिधींची जबाबदारी झटकण्याची प्रवृत्ती असल्याचे अनेकांनी म्हटले आहे. अशा घटनांमध्ये तातडीने हस्तक्षेप करून कुटुंबांना आर्थिक मदत देऊन कुटुंबाचे पुनर्वसन करणे हीच खरी सहानुभूतीची भूमिका ठरेल.**

लोकप्रतिनिधींच्या गंभीरतेवर प्रश्न उपस्थित करते. निधी उपलब्ध असूनही तो वापरला जात नाही, यावरून या कुटुंबाच्या दुःखात कमी न करता, ते अधिकच वाढवले गेले आहे. राजकीय नेत्यांकडून अशा संवेदनशील घटनांवर केवळ औपचारिकता करण्याचा प्रयत्न होतो, हे या घटनेतून स्पष्ट होते.

या घटनेत पितापुत्रांनी कर्जबाजारीपणामुळे आपले जीवन संपवले. मागे वडीलधारी व्यक्ती, आई, पत्नी व लहान मुले यांच्यासह एकत्र कुटुंब उघड्यावर पडले. अशा परिस्थितीत या कुटुंबाला तातडीने आर्थिक मदत मिळणे अपेक्षित होते. व त्या कुटुंबाचे पुनर्वसन करणे गरजेचे होते परंतु, निधी असूनही त्याचा योग्य वापर न होणे, हे दुर्दैवी आहे. या घटनेनंतर मिनकी गावातील नागरिकांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. आमच्या गावातील पितापुत्र कर्जबाजारीपणामुळे गेले, आणि अजूनही त्यांच्या कुटुंबाला मदत मिळालेली नाही, असे म्हणत नागरिकांनी लोकप्रतिनिधींच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. मिनकी गावातील घटनेने पुन्हा एकदा स्पष्ट केले आहे की, मदत व पुनर्वसन निधीचा योग्य व वेळेत उपयोग करण्यासाठी तातडीच्या उपाययोजनांची गरज आहे. अशा संकटाच्या वेळी पत्रव्यवहाराऐवजी त्वरित निर्णय घेऊन निधी थेट कुटुंबापर्यंत पोहोचवला पाहिजे.

# मातंग समाजाबरोबरच ब्राह्मण व्यक्तीनेही घेतली बौद्ध धम्माची दीक्षा भारता बरोबरच जगानेही नतमस्तक व्हावे अशी देहूरोडची धम्म भूमी-प्रबुद्ध साठे

लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी | अण्णासाहेब साबळे**





महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी २५ डिसेंबर १९५४ रोजी देहूरोड येथे भगवान बुद्धाची उघड्या डोळ्याची मुर्तीची प्रतिस्थापना करून बौद्ध भारताच्या पुनर्निर्माणाचा पाया घातला व प्रेरणा देणारी धम्म भूमी बनवली,भारताबरोबरच जगानेही नतमस्तक व्हावे अशी ही देहूरोडची धम्म भूमी असून मानवी जगाच्या कल्याणाची प्रेरणा व क्रांतीची देहूरोड धम्म भूमी आहे असे गौरवपूर्ण प्रतिपादन चला आपल्या बुध्दाच्या घरी अभियान प्रमुख व भारतीय बौद्ध धम्म संस्कार महासंघाचे संस्थापक अध्यक्ष- प्रबुद्ध साठे यांनी केले, ते देहूरोड धम्म भूमी च्या ७० व्या वर्धापनदिनानिमित्त आयोजित भव्य कार्यक्रम व बौद्ध धम्म दीक्षा समारंभात प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलत होते,या ऐतिहासिक कार्यक्रमाचे अध्यक्ष देहूरोड धम्म भूमीचे विकास प्रणेते भीम पुत्र टेक्सास दादा गायकवाड,यावेळी झालेल्या बौद्ध धम्म दीक्षा समारंभात अनेक बहुजन बांधवांनी बौद्ध धम्माची दीक्षा घेतली विषेशतः मातंग समाजाबरोबरच वादीराज पाटील या ब्राह्मण व्यक्तीने बौद्ध धम्माची दीक्षा घेतली हे या कार्यक्रमाचे खास वैशिष्ट्य ठरले,प्रबुद्ध साठे नवदीक्षीतांचे बौद्ध धम्मात सहर्ष स्वागत करीत त्यांना मंगलमय शुभेच्छा देताना पुढे म्हणाले,हे धर्मांतर नसून धम्मक्रांती आहे,आपण या ऐतिहासिक ठिकाणी बौद्ध धम्माची दीक्षा घेऊन घरवापसी केली असून बौद्ध धम्माच्या तत्त्वज्ञानाने तुमचे सुखी,आनंदी,शांती,परिवर्तनशील जीवन होईल,या देहूरोड धम्म भूमीत मराठा ओबीसी माळी,धनगर,आदिवासी,मातंग चर्मकार होलार रामोशी इत्यादी बहुजनांनी येवून बौद्ध धम्माची दीक्षा घेऊन आपल्या स्वगृही परत यावे,या भूमीचे विकास प्रणेते आदरणीय भीम पुत्र टेक्सास दादा गायकवाड नेहमी आपल्या स्वागतासाठी तयार असतील असेही प्रबुद्ध साठे यांनी म्हटले अध्यक्ष भीम पुत्र टेक्सास दादा गायकवाड यांनीही नवदीक्षीतांचे स्वागत केले व संविधान जनजागर परिषद मध्ये बोलताना,या देशाचे नाव भारत आहे,जो हिंदुस्तान म्हणेल त्यांच्या वर देशद्रोहाचा गुन्हा दाखल व्हावा,तसेच हिंदुस्थान म्हणणार्या राजकीय पक्षाची मान्यता काढून घेण्यात यावी,असा इशारा व मागणी टेक्सास दादा यांनी केली,यावेळी, राहुल खांडेकर,संघपाल शिरसाठ, विकास सुर्यवंशी साहेब,सयाजीराव गायकवाड,सुरेश त्रिभुवन गुरूजी, लक्ष्मण साळवे,प्राचार्य सुनील वाकेकर,अशोक गायकवाड,अंबादास शिंदे,भीम शाहीर सीमाताई पाटील, जॉली मोरे,आदी मान्यवर उपस्थित होते,विद्रोही कवी नितीन चंदनशिवे यांनीही ऐनवेळी उपस्थित होते,विनोद चौधरी,गजेंद्र चौधरी,संजय कांबळे,चंद्रकला सोनकांबळे,साधना मस्के,कलावती मस्के,याबरोबरच याबरोबरच ओमप्रकाश चितळे,मिना चितळे,भूषण चितळे,पार्थ चितळे या मातंग कुटुंबाबरोबर वादीराज पाटील या ब्राह्मणाने बौद्ध धम्माची दीक्षा घेतली,सूत्रसंचालन दिपक मस्के व डॉ किर्तीपाल गायकवाड यांनी केले यमराज इंगळे यांनी आभार मानले,कार्यक्रमाचे यशस्वी नियोजन,देहूरोड बुध्द विहार कृती समिती,अष्टप्रधान मंडळ,धम्म भूमी सुरक्षा समिती,धम्म भूमी एज्युकेशन सोसायटी,धम्म भूमी महिला महासंघ,जेष्ठ उपासक संघ यांनी केले.

# जिल्हाधिकारी कार्यालयात राजमाता जिजाऊ,स्वामी विवेकानंद जयंती साजरी



लोकनेता न्यूज नेटवर्क

**बुलडाणा | ज्ञानेश्वर बुधवत**

जिल्हाधिकारी कार्यालयात राजमाता माँ जिजाऊ व स्वामी विवेकानंद जयंतीनिमित्त अभिवादन करण्यात आले. उपजिल्हाधिकारी समाधान गायकवाड यांनी प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी जिल्हाधिकारी कार्यालयातील अधिकारी, कर्मचारी यांनीही राजमाता माँ जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेला पुष्प अर्पण करून अभिवादन केले.

# राष्ट्रीय मोदी सेवा समितीच्या महाराष्ट्र प्रदेशाध्यक्षपदी अंकुश जाधव यांची निवड

लोकनेता न्यूज नेटवर्क

**मुंबई | संदीप खरात**

लातूर जिल्ह्याचे सुपुत्र लोकनेते संघर्ष योद्धा गेले अनेक वर्ष बहुजन समाजातील जनसामान्यांसाठी झटणारे तसेच बहुजन समाजाला वेगळे दिशा देणारे युवकांना रोजगार शेतकऱ्यांना मदत जनसामान्यातील गरिबांना मदतीचा हात देणारे भारतीय जनता पार्टीचे खंदे समर्थक संघर्ष युद्धात अंकुश दादा जाधव यांची राष्ट्रीय मोदी सेवा समिती आरएमएस संघठनच्या महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष-पदी नियुक्ती निवड करण्यात आली, त्यांच्या निवडीमुळे लातूर जिल्ह्यासह सर्व महाराष्ट्रामध्ये बहुजन वर्गामध्ये च नव्हे तर सर्व जाती धर्मामध्ये-आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.लोकनेते अंकुश दादा जाधव साहेब यांच्या पाठीशी असंख्य कार्यकर्ते समाजबांधव शुभचिंतक आहेत अनेक संकटांना भेदून हे नेतृत्व तयार झाले आहे विविध प्रश्नांच्या शेतकऱ्यांसाठी ऊस आंदोलन दूध आंदोलन व बंजारा समाजाच्या मागणीसाठी आंदोलन अशा कित्येक आंदोलनामध्ये श्री अंकुश दादा जाधव यांनी सहभाग नोंदवून विस्थापित लोकांचा आवाज आपल्या धडाकेबाज भाषण शैलीतून बुलंद केला त्यांच्यावर अनेक संकट आले पण त्या संकटांना निर्भीडपणे सामोरे जात त्यावर विजय मिळवला





भारतीय जनता पार्टी पक्षाने राष्ट्रीय मोदी सेवा समिती राष्ट्रीय अध्यक्ष माननीय विकास जी यदुवंशी साहेब, यांनी त्यांच्यावर विश्वास दाखवून महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष पदी महाराष्ट्राचे अध्यक्ष म्हणून निवड केली व माझ्यावर जे जबाबदारी सोपवली ती जबाबदारी मी निष्ठेने व प्रामाणिकपणे पार पाडील असे श्रेय अंकुश दादा जाधव यांनी यावेळी सांगितले राष्ट्रीय मोदी सेवा समिती आरएमएस सेवा संघठन भारत जनकल्याणकारी योजना प्रचार प्रसार अभियान संपूर्ण भारत व महाराष्ट्रात चालविण्याचा निर्धार व बहुजन समाजापर्यंत उपक्रम राबविण्या चे महत्त्व जनसामान्यांमध्ये शेवटच्या घटकापर्यंत पोहोचवून त्यांना राष्ट्र विकासाच्या मुख्य प्रवाहात सामील करून घेणे हाच उद्देश ठेवून श्री अंकुश दादा जाधव यांनी प्रदेशाध्यक्ष पद स्वीकारले याबद्दल सर्व स्तरातून त्यांचे आनंदाचा वर्षाव होत आहे अशा या संघर्ष विद्याला मानाचा मुजरा या व त्यांच्या पुढील वाटचालीसाठी मनःपूर्वक शुभेच्छा,,,,!! धन्यवाद जय श्रीराम

# शालेय विद्यार्थ्यांना 'रायझिंग डे' निमित्त कंधार पोलीस स्टेशन भेट

लोकनेता न्यूज नेटवर्क

**कंधार | धोंडीबा मुंडे**

२ जानेवारी हा दिवस संपूर्ण महाराष्ट्रात पोलिस स्थापन दिन म्हणून साजरा केला जातो. त्यानिमित्ताने २ ते ७ जानेवारी दरम्यान 'रायझिंग डे' हा सप्ताह अनेक शाळा-कॉलेजामध्ये पोलिसांच्या वतीने आयोजित केला जातो. या सप्ताहात विद्यार्थ्यांना कायदेविषयक आणि स्वरक्षणाविषयक माहिती देऊन जनजागृती करण्याचा मानस असतो. त्यांचाच एक भाग म्हणून श्री शिवाजी हायस्कूलच्या शालेय विद्यार्थ्यांना कंधार पोलीस स्टेशन भेट कार्यक्रम घेऊन त्यांना पोलीस स्टेशन कामकाजाबाबत माहिती दिली.

यावेळी कंधार पोलीस स्टेशनचे



पोलीस निरीक्षक चंद्रकांत जाधव यांनी विद्यार्थ्यांना 'रायझिंग डे'विषयी माहिती देताना डायल ११२ तसेच बालकांचे लैंगिक छळ संबंधी कृत्यांबाबत व कायदेशीर उपाययोजना बाबत त्यांना समजेल अशा पद्धतीने माहिती दिली. नायलॉन मांजा दुष्परिणाम याबाबत माहिती देऊन ते न वापरण्याबाबत प्रोत्साहित केले. शस्त्रांसंबंधी माहिती, तसेच ठाणे अंमलदार ,वायरलेस, इत्यादी बाबतची माहिती प्रात्यक्षिकाद्वारे दिली आणि विद्यार्थ्यांना वाईट प्रवृत्तीपासून दूर रहा व मुलींना आपले संरक्षण स्वतः करा, असा सल्ला दिला. पोलिस उपनिरीक्षक इंगोले यांनी पोलीस ठाण्यातील कोठडी बद्दल विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून सकारात्मक दृष्टिकोन ठेवून चांगला माणूस होण्याचा प्रयत्न करा, असा उपदेश केला. यादरम्यान सपोनी खजे, पो उपनिरी इंगोले ,स पो उपनिरी कागणे, पो हवालदार साखरे, पो हवा गारोले,पो ना टाकरस,पो शि हराळे, सोनटक्के, गुंड्रे, मपोशी कांबळे, मारवाडे यांनी विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले तर श्री शिवाजी हायस्कूल कंधार चे मुख्याध्यापक अंबटवाड, जैनोद्दीन, अझर बेग, दत्तात्रय येमेकर व अन्य शिक्षक वृंद यांचे सहकार्य लाभले.

# नागेश्वर ज्युनिअर कॉलेजमध्ये युवा दिन साजरा

लोकनेता न्यूज नेटवर्क

**भोकरदन | राम शिंदे**

श्रीनागेश्वर कला व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय, बाभुळगांव येथे स्वामी विवेकानंद व राजमाता जिजाऊ साहेब जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रा.डि.आर.शेळके तर प्रमुख पाहुणे शेषराव कड होते.

स्वामी विवेकानंद व राजमाता राष्ट्रमाता मा जिजाऊ यांच्या प्रतिमेचे विद्यार्थी व शिक्षकांच्या हस्ते पुष्पगुच्छ वाहुन पुजन करण्यात आले.

यावेळी विद्यार्थी पुजा गावंडे,ऋतुजा जंजाळ,हर्षदा मिसाळ, राजकन्या शेजोळ,निकीता एडके,पुष्पा गिरणारे, मयुरी गंगावते,योगिता गावंडे, ऋतुजा लुटे,पल्लवी शिंदे,भाग्यश्री झगरे,आरती गिरणारे, ओम थोरात, निखील राऊत,प्रणव थोरात, वैभव राऊत,कृणाल इचे,कृणाल मतकर,ओम



अवसरमोल,स्वामी विवेकानंद वेशभुषेत रोहित मगरे,दत्ता मतकर, शंकर सुसर, प्रमेश्वर गावंडे आर.ई.पाटिल, जी.ए.जैन, देऊबा मैंद,पाडुरंग गंगावते,बाबुराव सुरशे,सुनिल दळवी, केशव गिरणारे,यांनी थोरांच्या जिवन चरित्रावरती प्रकाश टाकला.

अध्यक्षिय मार्गदर्शनात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना प्रा.डि.आर.शेळके यांनी युवा दिना निमित्त आजचे विद्यार्थी हे उद्याचे सशक्त भारतांचे आधार स्तंभ असल्यांने त्यांची सामाजिक जबाबदारी पटवुन देतांना निरव्यसनी राहुन आपल्या हातुन देशसेवा घडवुन गांवाचे व आई-वडीलांचे नांव उज्वल करावे असा संदेश देतांना उठा जागे व्हा ,आपले ध्येय सिद्धी प्राप्त करण्यासाठी व्यायाम, अभ्यास ,चिकाटी ठेऊन मुलिंनी राजमाता राष्ट्रमाता मा जिजाऊ आणि मुलांनी स्वामी विवेकानंदा प्रमाणे कार्य करण्याचे सांगितले.

# डिजिटल मीडिया परिषदेच्या सर्व पदाधिकारी व सदस्यांनी सहभागी व्हावे-प्रदेशाध्यक्ष वाघमारे

लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी | अण्णासाहेब साबळे**

मराठी पत्रकार परिषद आयोजित आदर्श जिल्हा व तालुका पत्रकार संघ पुरस्कार वितरण सोहळा आणि भव्य राज्यस्तरीय मेळाव्याचे आयोजन येत्या १ फेब्रुवारी २०२५ रोजी सेलू या ठिकाणी करण्यात आले असून या कार्यक्रमास महाराष्ट्र राज्यातील डिजिटल मीडिया परिषदेचे जिल्हा व तालुका पदाधिकारी आणि सदस्यांनी आवर्जून उपस्थित रहावे.असे आवाहन डिजिटल मीडिया परिषदेचे प्रदेशाध्यक्ष अनिल वाघमारे यांनी केले आहे.

मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त श्री.एस.एम.देशमुख सर यांच्या आदेशानुसार व परिषदेचे विश्वस्त किरण नाईक,विश्वस्त शरद पाबळे,अध्यक्ष मिलिंद अष्टीवकर सह राज्यस्तरीय पदाधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली परिषदेच्या वतीने प्रत्येक वर्षी महाराष्ट्र राज्यातील आदर्श जिल्हा व तालुका पत्रकार संघांना यथोचित सन्मान करून राज्यातील प्रमुख मान्यवरांच्या हस्ते पुरस्काराने गौरविले जाते.या वर्षी देखील परभणी जिल्ह्यातल्या सेलू या तालुका ठिकाणच्या शहरामध्ये हा भव्य सोहळा येत्या एक १ फेब्रुवारी २०२५ रोजी होत आहे.मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त



माननीय श्री.एस.एम.देशमुख यांनी काही दिवसांपूर्वीच या ठिकाणी भेट देऊन सेलु पत्रकार संघाची बैठक घेत पदाधिकाऱ्यांकडून आढावा घेतला. या आढावा बैठकीसाठी आम्ही स्वतः उपस्थित होतो.हा भव्य पुरस्कार वितरण सोहळा व राज्यस्तरीय मेळावा फक्त एक दिवसाचा असणार आहे. राज्यभरातुन मुक्कामी येणाऱ्या पत्रकार बांधवांच्या निवासस्थानाची व भोजनाची व्यवस्था सेलु तालुका पत्रकार संघाकडून करण्यात आली आहे.मराठी पत्रकार परिषदेशी संलग्न असलेली ही डिजिटल मिडिया परिषद आहे.महाराष्ट्र राज्यातील डिजिटल मिडिया परिषदेच्या जिल्हा आणि तालुका पदाधिकारी व सदस्यांनी या मेळाव्यात सहभागी होणे बंधनकारक आहे. डिजिटल मिडिया परिषदेचे राज्य कार्याध्यक्ष संतोष शिंदे,उपाध्यक्ष

अनिल उंबरकर, प्रदेश सदस्य अनिल धुपदाळे कोल्हापूर ,प्रदेश सदस्य जितेंद्र सिरसाठ बीड मराठवाडा,प्रदेश सदस्य तानाजी जाधव सांगली, प्रदेश सदस्य मल्हार पवार कर्जत रायगड, प्रदेश सदस्य शेख अफताब अहिल्याबाईनगर या सर्व राज्यस्तरीय पदाधिकारी यांनी जबाबदारी घ्यावी.आपणास व इतर पदाधिकारी यांचे काही म्हणणे असल्यास आम्हाला ९८२२५४८६९६ या मोबाईल नंबर वर संपर्क साधावा असे आवाहनही डिजिटल मिडिया परिषदेचे प्रदेशाध्यक्ष अनिल वाघमारे यांनी केले आहे.

हे पत्रक,मालक,मुद्रक, प्रकाशक संपादक ज्ञानेश्वर भाऊसाहेब मुंढे यांनी न्यू गीता प्रिंटिंग प्रेस मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ येथे छापून दैनिक लोकनेता कार्यालय हो.नं ५०,मेन रोड मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. मो.नं ८४५९९७७९०४

This Newspaper is printed by owner, printer, publisher editor Dyaneshwar Bhausaheb Mundhe at New Geeta Printing Press Mirkala Ta Gevrai District Beed 431127 and published at Dainik Lokneta Office Ho.No. 50, Main Road Mirakala Ta Gevarai District Beed 431127 (Maharashtra) Mo no 84599 77904